आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ जानेवारी २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय आरोग्य अभियान आणखी ५ वर्षं चालवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- दावोस गुंतवणूकदार परिषदेत पहिल्याच दिवशी राज्य सरकारने केले सहा लाख २५ हजार ४५७ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार

- बेटी बचाओ- बेटी पढाओ अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- निवडणूक काळात उत्तम कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाचा महाराष्ट्राला पुरस्कार, मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांचाही गौरव

**<><><><><>**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाला पुढची पाच वर्षं मुदतवाढ देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत भारताने कोविडविरोधात मोठा लढा दिला. २२० कोटींहून अधिक कोविड प्रतिबंधक लसी देण्यात आल्या असं गोयल यांनी सांगितलं. भारताने गेल्या दशकभरात आरोग्य क्षेत्रात अनेक बाबतीत सुधारणा केल्या आहेत. बालमृत्यू, मातामृत्यूचं प्रमाण घटलं असून

क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यात सरकारला यश आल्याचं गोयल म्हणाले.

२०२५-२६ च्या हंगामासाठी कच्च्या तागाच्या किमान हमीभावात ६ टक्के वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याची माहिती पीयूष गोयल यांनी यावेळी दिली. तागाला ५ हजार ६५० प्रति क्विंटल इतका हमीभाव देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. हा हमीभाव लागवड खर्चापेक्षा ६७ टक्के अधिक असून याचा लाभ ईशान्य भारतातल्या ४० लाख कुटुंबांना होणार असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दावोस इथल्या जागतिक आर्थिक गुंतवणूकदार परिषदेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्र सरकारने सहा लाख २५ हजार ४५७ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत. एकाच दिवशी इतक्या मोठ्या रकमेचे करार होणं, हा एक नवा विक्रम आहे. आज दुसऱ्या दिवशी सुद्धा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करार होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अनेक कंपन्यांच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित केलं. टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, काल्सबर्ग समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जेकब अरुप अँडरसन, रिटेल क्षेत्रात कार्यरत लुलू समूहाचे प्रबंध संचालक एमए युसुफ अली, रिन्यू पॉवरचे अध्यक्ष सुमंत सिन्हा यांची फडणवीस यांनी भेट घेतली. बीड जिल्ह्यात १५ हजार मेगा वॅट पाईपलाईन आणि पवनऊर्जा प्रकल्पाबाबत यावेळी चर्चा झाली.

<><><><><>

अन्नप्रक्रीया उद्योगातली कंपनी एबी इन बेव ने भारतात २५ कोटी डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय अन्नप्रक्रीयाउद्योग मंत्री चिराग पासवान यांनी या कंपनीच्या प्रतिनिधींबरोबर दावोस इथं जागतिक गुंतवणूकदार परिषदेदरम्यान चर्चा केल्यावर ही माहिती दिली.. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दावोसमधे स्विस फेडरल रेल्वेच्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चा केली. रेल्वे सुरक्षा तंत्रज्ञान आणि देखभालीच्या आधुनिक पद्धती या विषयावर यावेळी चर्चा झाली. त्यानंतर वैष्णव यांनी सेंट मार्ग्रेथ इथल्या रेल्वे कोच निर्मिती कारखान्याला भेट दिली.

<><><><><>

राष्ट्रीय शेअर बाजारातल्या नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या ११ कोटींहून अधिक झाली आहे. गेल्या पाच वर्षांत या नोंदणीत ३ पूर्णांक ६ दशांश टक्के इतकी वाढ झाली आहे. १९९४ मध्ये राष्ट्रीय शेअर बाजाराची स्थापना झाल्यापासून पुढची १४ वर्षं १ कोटी इतके गुंतवणूकदार होते. त्यानंतर मात्र हा वेग वाढला. गेल्या पाच महिन्यांत १ कोटी नव्या गुंतवणूकदारांची नोंदणी करण्यात आली आहे.

<><><><><>

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेशी गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यात १४ लाख ६३ हजार सदस्य जोडले गेले आहेत. ऑक्टोबर २०२४ च्या तुलनेत यात ९ टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे.

रोजगारात वाढ आणि कर्मचाऱ्यांमध्ये वाढती जागरुकता यामुळेच सदस्य संख्या वाढल्याचं कामगार आणि रोजगार मंत्रालयानं म्हटलं आहे. वेतनश्रेणी डेटानुसार या सदस्यांपैकी ४ लाख ८१ हजार सदस्य हे १८ ते २५ वर्षे वयोगटातील असून २ लाख ४० महिला आहेत.

**<><><><><>**

बेटी बचाओ - बेटी पढाओ या अभियानाला आज दहा वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त दिल्लीत एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून त्यात सशस्त्र दल, निमलष्करी दल, दिल्ली पोलीस, विद्यार्थिनी आणि अंगणवाडी सेविकांच्या महिला अधिकारी सहभागी होतील. राज्यातही ठिकठिकाणी यानिमित्त विशेष कार्यक्रम होत आहेत. नाशिक महानगरपालिकेत आयोजित कार्यक्रमात आयुक्तांनी उपस्थितांना शपथ दिली. अभियानात मुलींचे संरक्षण, शिक्षणाला प्रोत्साहन, लिंगभेद निर्मूलन यासाठी जनजागृतीपर उपाय करण्यात येणार आहेत. बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाचा भाग असलेल्या सुकन्या समृद्धी योजनेला देशात उत्तम प्रतिसाद मिळत असून, या योजनेत आतापर्यंत चार कोटीहून अधिक खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेत आठ पूर्णांक दोन दशांश **टक्के इतका** व्याजदर दिला जातो. या अभियानामुळे स्त्री आणि पुरुषातील लिंगभावभेद कमी झाला तसंच मुलींच्या शिक्षण आणि करिअरसाठी योग्य वातावरण तयार झालं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण कमी होतं तिथेही बदल घडला, या अभियानामुळे स्त्री-पुरुष समानतेकडे लोकांचं लक्ष वेधलं गेलं असंही

प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. आपल्या मुलींच्या अधिकारांचं संरक्षण करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

निवडणूक काळात उत्तम कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्राला पुरस्कार जाहीर केला आहे. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. २०२४-२५ या वर्षासाठी महाराष्ट्रासोबत जम्मू आणि काश्मिर तसंच झारखंडलाही पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय मुंबई शहरचे जिल्हाधिकारी संजय यादव आणि मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांना विशेष श्रेणीत पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या शनिवारी, राष्ट्रीय मतदार दिनी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><><>**

शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुढील वर्षभर राज्यभरातल्या एसटीच्या सर्व बसस्थानकांवर “हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान” राबवण्यात येणार आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबतची घोषणा केली. यानिमित्तानं राज्यभरात प्रत्येक बसस्थानकावर शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे.

वर्षभर चालणाऱ्या या अभियानामध्ये दर तीन महिन्यांनी प्रत्येक बसस्थानकाचं मूल्यमापन होणार असून, शहरी गटातून पहिल्या येणाऱ्या

बसस्थानकाला१ कोटी, निमशहरी गटातून पहिल्या येणाऱ्या बसस्थानकाला ५० लाख तर ग्रामीण गटातून पहिल्या येणाऱ्या बसस्थानकाला २५ लाख रुपयांचं बक्षीस दिलं जाणार आहे.

**<><><><>**

केईएम रुग्णालय  मुंबईकरांचा खऱ्या अर्थाने आधारवड असून  त्यांना जागा कमी पडू नये यासाठी केईएम मध्ये आयुष्मान शताब्दी टॉवर उभे करावेत असे  असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. ते

केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी समारंभात बोलत होते. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यासह केईएमच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आदी मान्यवर उपस्थित होते. केईएमने घेतलेलं रुग्णसेवेचं व्रत अवघड आहे. आजही इथली रुग्णसेवा अहोरात्र चालू आहे. इथल्या डॉक्टरांचे, नर्सेसचे, कर्मचाऱ्यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत. असंही शिंदे यावेळी म्हणाले.

**<><><><>**

नाशिक इथल्या संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पौषवारीची तयारी अंतिम टप्प्यात आली असून देवस्थान पोलीस प्रशासन आणि नगरपालिकेनं यासाठी नियोजन केलं आहे. या उत्सवासाठी राज्याच्या विविध भागातून त्र्यंबकेश्वरच्या दिशेनं दिंड्या येत आहेत. संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांची पौषवारी उद्यापासून ते २७ जानेवारी दरम्यान होणार आहे. यानिमित्तानं राज्यातले मान्यवर कीर्तनकार आपली कीर्तन सेवा देणार आहेत.

**<><><><><>**

ठाणे पोलिसांनी काल ५ कोटी रुपये किंमतीचं ५ किलो अंबरग्रीस म्हणजेच व्हेल माशाची उलटी जप्त केली. या प्रकरणी पुण्याजवळ दीघी इथून एकाला अटक करण्यात आली आहे. ८० लाख रुपयांची अंबरग्रीस घेऊन एक जण ठाण्यातल्या साकेत मध्ये येणार असल्याची खबर मिळाल्यावरुन ठाण्याच्या गुन्हे अन्वेषण पथकानं ही कारवाई केली. आरोपीला पोलीस कोठडीत पाठवण्यात आलं असून अधिक तपास सुरु आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. विशेष मकोका सत्र न्यायाधीश सुरेखा आर. पाटील यांच्यासमोर दूरदृश्य प्रणालीद्वारे या प्रकरणाची सुनावणी आज सकाळी झाली. केज इथल्या न्यायालयामध्ये खंडणी प्रकरणी उद्या सुनावणी होणार आहे.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या कार अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. अपघातग्रस्त कुटुंब एका लग्नसोहळ्यावरून घरी परतत असतानाच हा अपघात झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

***//<><><><><>//***